divyamarathi.com

# विश्व साहित्य संमेलन आता ऑनलाइन

प्रतिनिधी | पुणे

विश्व साहित्य संमेलनाच्या निमित्ताने झालेले वाद, मानापमान आणि संशयकल्लोळाचे प्रयोग, आर्थिक पेच, अविश्वासाचे वातावरण यांना छेद देत चक्क ऑनलाइन विश्व साहित्य संमेलन तब्बल दहा दिवस होणार आहे. बुकगंगा डॉट कॉमतर्फे आयोजित या ऑनलाइन संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांच्या हस्ते येथे झाले. www.vishwasahityasammelan.org या संकेतस्थळावर हे संमेलन होत आहे.

हे ऑनलाइन विश्व साहित्य संमेलन २४ तास सुरू राहणार आहे, अशी माहिती संयोजक मंदार जोगळेकर यांनी दिली. मायविश्वचे धनंजय दातार, निवेदन सुधीर गाडगीळ याप्रसंगी उपस्थित होते. या ऑनलाइन संमेलनाचे अध्यक्षपद तसेच विविध पुरस्कारांची निवडही पर्याय सुचवून ऑनलाइन पद्धतीनेच केली जाणार आहे. जगभरातील

## संमेलनाची वैशिष्ट्ये

- संमेलन २४ तास सुरू
- तब्बल दहा दिवसांचा कालावधी
- चर्चासत्रे, कविसंमेलन, पुस्तकांची यादी, ब्लॉगर्सची माहिती एकत्रित स्वरूपात
- आवडता लेखक, कवी, प्रकाशक, वाचक आणि ब्लॉगरसाठी पुरस्कार
- फेसबुकवरही स्वतंत्र पेजच्या रूपाने उपलब्ध

## सर्वांसाठीच संमेलन

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी साहित्याचा प्रचार व प्रसार करणे, जगभरातील मराठीप्रेमींना सामायिक व्यासपीठ देणे, साहित्यक्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण करणे आणि मराठीत प्रकाशित होणाऱ्या अधिकाधिक पुस्तकांची माहिती जगभरात पोहोचवणे तसेच मराठी ग्रंथांची नोंद करून ती जतन करणे, असे अनेक उद्देश या संमेलनाच्या आयोजनामागे आहेत. टेक्नोसॅव्ही

लेखक, प्रकाशक, ब्लॉगर, वाचक, विद्यार्थी आणि माध्यमे या सर्व घटकांना संमेलनात थेट सहभाग घेता येणार आहे, असे जोगळेकर म्हणाले.

पिढीप्रमाणेच जिज्ञासू ज्येष्ठ आणि उभरते वाचक यांच्यासाठी या ऑनलाइन संमेलनात बरेच काही आहे, असेही जोगळेकर यांनी सांगितले.